Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18852115

# सुशासन आणि महिला सुरक्षा : धोरणे अंमलबजावणी व वास्तव

**सपना भाऊसाहेब झिने[1] & डॉ. ज्योती सुभाषराव धायगुडे[2]**

**प्रस्तावना :-**

स्त्री ही राष्ट्राची आधारशिला आहे, हे वचन केवळ तत्वज्ञान नसून ते कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप आहे. त्याचप्रमाणे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील म्हणतात "मी एखाद्या समुदायाची प्रगती त्यामधील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजतो. I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे - २००३) यावरून हे समजते की देशाच्या प्रगतीसाठी कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही त्या राष्ट्रातील महिलांच्या प्रगतीवर मोजली पाहिजे. मात्र भारतातील महिलांची परिस्थिती पाहता, पूर्वीपासूनच असुरक्षित, मागास व त्यांच्यावर अनेक अत्याचार होतांना दिसून येतात. म्हणून देशाची प्रगती हवी असेल, तर देशातील महिलांची प्रगती याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आणि शासनाचे सुशासनात रूपांतर होणे देखिल गरजेचे आहे. अधुनिक काळात महिलांची सुरक्षा हा केवळ नैतिक प्रश्न न राहता तो सुशासनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. आज २१व्या शतकात भारत महासत्तेकडे वाटचाल करत असताना, देशातील निम्मी लोकसंख्या असलेल्या महिलांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण मिळणे ही काळाची गरज आहे.

महिलांना पुरुषासारख्या सर्वसंधी उपलब्ध करून देणारे आणि लिंगभेदाच्या आधारावर कुठलाही मतभेद न करता प्रत्येक महिलेला व व्यक्तीला प्रतिष्ठा प्रदान करणारे पहिले दस्तावेज म्हणजे भारतीय संविधान आहे. (साबळे. के. के - २०२१) या संविधानातील तरतुदीनुसार कल्याणकारी राज्याच्या स्थापनेसाठी आणि महिलांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी गेल्या काही दशकात भारत सरकारने आणि राज्यसरकारांनी महिलांच्या सुरक्षितेसाठी अनेक क्रांतिकारी धोरणे आखली आहेत. त्या धोरणात विविध योजना, कायदे व महिला सुरक्षाविषयक उपक्रम राबवले जातात.

परंतु, धोरणे कागदावर जेवढी भक्कम दिसतात, तेवढीच ती प्रत्यक्ष अंमलबजावणीत प्रभावी आहेत का? हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. कारण सुशासन म्हणजे केवळ कायदे करणे नव्हे, तर त्या कायद्यांची पारदर्शक, उत्तरदायी आणि जलद अंमलबजावणी करणे होय. आज ही नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) ची आकडेवारी मात्र महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या आलेखाकडे निर्देश करते. पोलीस प्रशासनातील संवेदनशीलता, न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब आणि सामाजिक मानसिकतेतील जडत्व यामुळे सुशासनाच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे निर्माण होतात.

[1] संशोधक, लोकप्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
[2] मार्गदर्शक, प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

प्रस्तुत शोधनिबंधात सुशासनाच्या चौकटीत राहून महिला सुरक्षा धोरणांच्या अंमलबजावणीचे वास्तव तपासण्याचा प्रयत्न केला आणि महिलांविषयक धोरणे आणि त्यांचे उद्‌दिष्ट्ये जाणून घेतलेली आहेत. तसेच प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी, उपलब्ध संसाधनांचा वापर आणि सामान्य महिलेला मिळणारा न्याय यांमधील दरी अधोरेखित केलेली आहे.

**सुशासन :-**

भारतातील सुशासनाची संकल्पना ही जरी १९९१ नंतरच्या काळात प्रभावीपणे प्रशासनात सक्रिय होत असताना दिसत असली तरी ही, प्राचीन भारताच्या वेगवेगळ्या राजवटीत राज्यकारभारातुन महत्वाची भूमिका पार पाडत होती. उदा. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातून 'राजाने तेच करावे जे जनतेला पाहिजे असेल' अर्थात कौटिल्याचा आदर्श राजा, प्लेटोचे 'आदर्श राज्य' या नुसार तसेच मोगल काळात व शिवकाळातील महिला कल्याण संदर्भित आदर्श धोरणातून देखिल सुशासन ही संकल्पना अस्तित्वात होती. कारण राज्यकारभार कसा असावा? राज्याची कर्तव्य काय? राज्याचे दुसऱ्या राज्याशी संबंध कसे असावेत या बाबतचा सर्व उल्लेख त्या-त्या काळात दिसतो. तसेच दुसरीकडे सद्यस्थितीत भारतातील कल्याणकारी राज्यव्यवस्थेमुळे परमिट राजव्यवस्थेमध्ये नोकरशाही भ्रष्टाचार, अकार्यक्षमता यामुळे व प्रशासनात राजकीय हस्तक्षेप या सर्व सार्वजनिक क्षेत्रातील धोरणांमुळे सुशासन या संकल्पनेला अधिक महत्व प्राप्त होऊन आस्तित्वात आलेली दिसून येते.

सुशासन म्हणजे पारदर्शक, जबाबदार, लोकाभिमुख शासन म्हणजे, सुशासन होय. तसेच काही विचारवंतांनी पुढील प्रमाणे व्याख्या द्वारे सुशासनाचा अर्थ सांगितलेला आहे.

**विवेक चोप्रा:** "सुशासन म्हणजे नि:संदिग्धपणे मूलभूत सामाजिक मूल्य शोधणे आणि त्यांचा पाठपुरावा करणे होय" (It is unambiguously identifying the basic values of society and pursuing these)

**पै. पानंदीकर :** यांच्या नुसार "सुशासन म्हणजे अशी व्यवस्था होय, ज्या ठिकाणी लोकांचे जीवन शांततापूर्ण शिस्तबद्ध, प्रगतिशील व सहभाग दर्शविणारे आहे." (Nation which handles its people to lead a peaceful, orderly, reasonable, prosperous and participatory lives)

थोडक्यात सुशासन म्हणजे चांगले शासन जे साधे, उत्तरदायी, नैतिक, जबाबदार आणि पारदर्शक शासन असे सांगता येईल.

सुशासनाचे वैशिष्ट्य हे लोकांना स्वातंत्र्याची उपलब्धता करून देणे, नोकरशाही उत्तरदायित्व पारदर्शकता आणि कार्यक्षमता व परिणामकारक ठेवणे, शासन आणि समाज यांच्यात परस्परसंबंध आणून कल्याणकारी प्रशासन जे जनतेच्या हिताचे आहे असे शासन निर्माण करणे व मानवी विकासाला प्राधान्य देणे आणि कायद्‌याद्‌वारे नियंत्रण करून मानवीहक्कांचे संरक्षण करणे, तसेच वेळोवेळी प्रशासनात सुधारणा करणे म्हणजे प्रशासनात ताठरता लवचिकता आणणे, लोकाभिमुख शासनव्यवस्था करणे हे आहे. यासाठी शासनाने ई-गव्हर्नन्स, माहितीचा अधिकार, घटनात्मक

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18852115

सुधारणा, न्यायव्यवस्थेत सुधारणा परिणामकारक धोरणात्मक संरचना इ. गोष्टी अमलात आणलेल्या आहेत. तसेच सुशासनवाढीसाठी महत्वपूर्ण साधने म्हणजे मानवी हक्काचे संरक्षण कायदा १९९३, कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५, केंद्रीय प्रशासन धोरण १९८५ आणि महिला सक्षमीकरण धोरणे सांगता येतील.

“स्त्रियांचे सबलीकरण किंवा सक्षमीकरण म्हणजे तिचे व्यक्तीमत्व एक माणूस म्हणून विकसित करायचे व त्यांना समान संधी द्यायची म्हणजेच त्यांचे आरोग्य विषयक सबलीकरण, शैक्षणिक सबलीकरण, आर्थिकदृष्ट्या सबलीकरण, राजकीयदृष्ट्या सबलीकरण एकंदरीत संपूर्ण माणूस म्हणून सबलीकरण करणे आहे. तसेच सबलीकरण म्हणजे तिला भीक हवी असा अर्थ होत नाही, तर स्त्रियांना पुरुषांप्रमाणे सर्व क्षेत्रात समान संधी हवी असा अर्थ आहे.” (अहिरे सुनंदा. ल., साळुंके उषा. य. - २०१२). सद्यस्थिती पाहता महिला सक्षम किंवा सबल असणे ही काळाची गरज आहे. कारण महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार वाढतांना दिसतात. सुशासन आणि महिला सुरक्षा हे दोन्ही विषय एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जेव्हा प्रशासन पारदर्शक, उत्तरदायी आणि सक्रिय असते, तेव्हाच महिलांना समाजात सुरक्षित आणि सन्मानित वाटू शकते.

भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे महिला आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूद घटनेमध्ये केलेली आहे (महिला धोरण - २०१४). या भारतीय घटनेतील तरतुदीनुसार सुशासन स्थापनेसाठी व कल्याणकारी शासनव्यवस्थेसाठी, महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देण्यासाठी आणि महिलांना सक्षम करून त्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध महिलांविषयक कायदे व धोरणे वेळोवेळी केंद्र तसेच राज्यसरकारने केलेली आहेत. ते पुढील प्रमाणे.

**स्त्री सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरण - २००१**

केंद्र शासनाने २० मार्च २००१ रोजी महिला विकासाकरिता धोरण जाहिर केले. त्यात दहाव्या पंचवार्षिक योजनेत महिला विकास व कल्याणाकरिता विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१) महिलांच्या शारीरिक, मानसिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे.

२) देशात महिलांसाठी असे वातावरण निर्माण करायचे की, ज्यामुळे आर्थिक आणि सामाजिक धोरण निर्मितीत सहभागी करून घेण्याबाबत जाणीव निर्माण होईल.

३) महिलांना उपलब्ध अधिकारांचा कमाल उपयोग करून घेण्यासाठी कार्यक्षम बनविणे. ४) शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांसाठी आरक्षण ठेवल्यामुळे महिलांचा विकास होत आहे व समाजाच्या तळाच्या स्तरापर्यंत महिलांचा विकास होत आहे.

५) जनजागृती करून विविध योजनांची माहिती देणारी केंद्रे सुरू करण्यात येतील.

६) मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिला विकास समिती स्थापन करण्यात येईल. सर्व समित्यांवर महिला असतील.

७) महिला सहभाग, संरक्षण, आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती या सर्वांचा महिला धोरणात समावेश आहे. (वैरागडे उज्वला, मुळे विद्युल्लता - २०१२) इ. महिलाविषयक केंद्र शासनाच्या २००१ धोरणाची उद्दिष्ट्ये सांगितलेली आहेत.

**महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण - १९९४**

१९९४ साली महाराष्ट्र शासनाने पहिले महिला धोरण जाहीर केले. अशा स्वरूपाचे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. (पाटील अरुंधती सूर्यकांत - २०१२) १९९४ मध्ये बदलेल्या काळाचा रोख ओळखून महिला धोरण राबवणारे पहिले राज्य अशी महाराष्ट्राची ओळख झालेली दिसून येते. त्याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१) महिलांचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची सुयोग्य सुधारणा करणे.

२) स्त्रियांचे ज्ञान व कौशल्य वाढविणे.

३) झोपडपट्ट्यांतील महिलांपर्यंत शासकीय व निमशासकीय योजनांची माहिती पुरवणे. ४) समाजातील प्रचलित परंपरा व संकल्पना बदलणे.

५) कौटुंबिक हिंसाचार कायदा तयार करणे. (महाराष्ट्र शासनाचे महिला संबंधी धोरण - १९९४) महाराष्ट्र शासनाच्या महिला विषयक धोरण १९९४ च्या उद्दिष्ट्यावरून समजते की, हे धोरण महिलांविषयी सुरक्षितता व सक्षमीकरणाला अधिक महत्व देते आणि महिलांवर होणाऱ्या अन्यायाला रोखण्यासाठी महत्वाचे धोरण आहे. तसेच यामुळे शासनाचे सुशासनात रूपांतर होईल असे धोरणांच्या उद्दिष्टावरून समजते.

**महाराष्ट्र राज्याचे महिला धोरण १९९८**

१९९४ च्या धोरणाच्या त्रुटी दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९९८ ला दुसरे धोरण जाहिर केले. ज्याचे (उद्दिष्ट) महिलांचे सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण करणे हे या नवीन धोरणाचे उद्दिष्ट्ये होते. त्यात पुढील उद्दिष्ट्ये ठरविलेली होती.

१) कायद्याद्वारे महिलांचे सबलीकरण करणे.

२) आर्थिक कार्यक्रमाद्वारे महिलांचे सबलीकरण करणे.

३) शिक्षण व साक्षरतेवर भर देणे.

४) आरोग्यासाठी महिलांमध्ये जनजागृती इ. गोष्टींवर भर देण्यात आला.

**महाराष्ट्र राज्य महिला धोरण २००१**

महिलांबाबत होणारे सर्व भेदभाव दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १९७१ मध्ये काही ठराव संमत केले होते. ८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त नव्या धोरणाला राज्यमंत्री मंडळानी ७ मार्च २००१ रोजी मान्यता दिली. महिला संरक्षण यावर भर देण्यात आला. महिला व बालकल्याण मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची उपसमिती नेमली गेली. दर वर्षी ३ जानेवारी रोजी येणाऱ्या सावित्रीबाई फुले स्त्री मुक्ती दिनी या सनदेचे जाहीर वाचन केले जावे. या धोरणामध्ये महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती तसेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रिभूत मानून नियोजन केले जाईल या बाबींचा महिला धोरणात समावेश आहे. त्याचबरोबर महिलांसाठी प्रसाधनगृहांची सुविधा अपुऱ्या आसल्याने त्यावर परिणामकारक व कालबद्धरितीने उपाययोजना करणे ही बाब समाविष्ट आहे. (वैद्य. अ. नि. - २०१४) अशा प्रकारे २००१ चे महाराष्ट्रातील महिला धोरण असून त्याची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगितलेली आहेत.

१) स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना आरक्षण.

२) स्वयंसहाय्यता गट निर्माण करून ५ वर्षात ५ लाख महिलांना सक्षम करणे.

३) गावपातळीवर महिला सभा.

४) शासकीय योजना, कार्यक्रम आखताना त्यातुन महिलांना होणाऱ्या लाभाची निश्चिती प्रारंभि प्रारंभिच करण्याची हमी.

५) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ थांबवण्यासाठी उपाययोजना.

६) देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी नवीन अधिनियम.

**महाराष्ट्र राज्य महिला धोरण - २०१४**

दुसरे धोरण जाहीर होऊन बरीच वर्षे लोटली, त्यामुळे काळाच्या ओघात बदलती परिस्थिती, पुढे आलेल्या नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून महिलांच्या धोरणामध्ये सुधारणा करणे गरजेचे होते. म्हणून ७ मे २०१३ रोजी मंत्र्यांच्या महिला व बालविकास अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. मार्च २०१४ रोजी जाहीर झालेले तिसरे महिला धोरण महाराष्ट्रातील सर्वांगीण विकास, सक्षमीकरण, पुरुषप्रधान मानसिकता बदलणे, महिलांना समान संधी, स्त्रियांना पाठबळ, स्त्री-पुरुष जन्मदर समान ठेवणे, गृहिणीच्या घरकामाला प्रतिष्ठा, देहविक्री करणाऱ्या महिला, लोककलावंत, तृतीयपंथी यांचे पुनर्वसन असंघटित महिलांचे प्रश्न अशी उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून जाहीर झाले. या उद्दिष्ट्या

वरून असे समजते की, सुशासन वाढीसाठी आणि महिला सुरक्षेसाठी हे धोरण महाराष्ट्रासाठी गरजेचे होते. या धोरणातील काही प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे.

१) प्रगतीशील महिला शेतकऱ्यांना कृषी भूषण धर्तीवर पुरस्कार देणे.

२) महिला उद्योजकांकरिता स्वतंत्र वित्तीय महामंडळ स्थापन करणे.

३) पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेल्या (एकटी) विधवा, परित्याक्ता, घटस्फोटीत महिलांना साठवणूक केलेल्या मालास १०० टक्के विम्याचे संरक्षण दिले जाईल.

४) गावपातळीवर महिला पर्यावरणाची स्थापना.

५) स्वतंत्र लिंगभाव व संवेदनशीलता अभ्यासक्रम रचना समिती निर्माण करून हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाईल. (कुटे माधवी - २००९) अशा प्रकारे प्रमुख तरतुदी केलेल्या आहेत.

**महाराष्ट्र राज्य महिला सुरक्षा धोरण - २०२४**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने ८ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्राचे चौथे महिला धोरण जाहीर केले. हे धोरण प्रामुख्याने 'अष्ट सूत्री' (८ मुख्य मुद्दे संकल्पनेवर आधारित आहे.) या धोरणाची मुख्य उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

**१) आरोग्य, पोषण आणि कल्याण** : महिलांच्या आरोग्यासाठी मोफत तपासणी शिबिरे आणि सकस आहारावर भर.

**२) शिक्षण आणि कौशल्य** : माध्यमिक व उच्च शिक्षणात मुलींची नोंदणी वाढवणे आणि रोजगारभिमुख कौशल्य विकास करणे.

**३) हिंसाचार निर्मूलन** : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सुरक्षित वातावरण आणि 'शक्तीसदन' सारख्या निवासस्थानांची निर्मिती.

**४) लिंगसमावेशक पायाभूत सुविधा** : नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, लहान मुलांसाठी पाळणाघर आणि सुरक्षित सार्वजनिक सुविधा.

**५) आर्थिक सक्षमीकरण** : महिला बचतगटांना भांडवल पुरवणे आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे.

**६) शासकीय आणि राजकीय सहभाग** : महिला लोकप्रतिनिधींना निर्णय प्रक्रियेत प्रभावी करण्यासाठी नेतृत्व प्रशिक्षण.

**७) नैसर्गिक साधनसंपत्ती** : हवामान बदल आणि आपत्ती व्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढविणे.

**८) क्रीडा धोरण :** महिला आणि मुलींसाठी क्रीडाक्षेत्रात विशेष संधी आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

**२०२४ च्या महिला धोरणातील महिला सुरक्षा व सुशासनासाठी विशेष निर्णय आणि अंमलबजावणी**

**१) आईचे नाव लावण्याचा निर्णय :** अधिकृत कागदपत्रांवर वडिलांच्या नावाप्रमाणे आईचे नाव बंधनकारक करण्याचा निर्णय २०२४ मे पासून लागू करण्यात आला आहे. यामुळे आता सरकारी कागदपत्रांवर वडिलांच्या नावासोबत आईचे नाव लावणे बंधनकारक केलेले आहे.

**२) मुलींना मोफत उच्च शिक्षण :** उच्च शिक्षणासाठी मुलींना आर्थिक पाठबळ आणि सवलतीची तरतूद २०२४ शैक्षणिक वर्षापासून करण्यात आलेली आहे.

**३) घर खरेदीत सवलत :** महिलांच्या नावावर घर असल्यास मुद्रांक शुल्कात (Stamp Duty) मध्ये १% सवलत. तसेच मिळकत कर सवलत म्हणून घर महिलांच्या नावावर असल्यास अनेक महानगरपालिका (Property Tax) मध्ये ५०% ते १०% देतात.

**४) एसटी प्रवास सवलत :** राज्य परिवहन मंडळाच्या बस प्रवासात महिलांना ५०% सवलत (महिला सन्मान योजना) मध्ये दिली आहे.

**५) अहिल्याबाई होळकर मोफत पास योजना :** ही जुनी योजना आहे, पण २०२३-२४ मध्ये याचा विस्तार करण्यात आला.

**६) पिंक रिक्षा योजना २०२४ :** महिलांना स्वतःचा रोजगार सुरू करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पिंक रिक्षांना अनुदान.

**७) स्वाधार आणि शक्ती सदन :** संकटात सापडलेल्या, निराधार किंवा कौटुंबिक हिंसाचार ग्रस्त महिलांना तात्पुरता निवारा, अन्न आणि कायदेशीर मदत पुरवणे.

**८) महिलांसाठी सुरू झालेल्या वेगवेगळ्या योजना :** २०२४ चे चौथे महिला धोरण लागू झाल्यावर यातील अनेक योजनांना नव्याने गती देण्यात आली किंवा त्या अधिक व्यापक करण्यात आल्या. त्या खालील प्रमाणे.

• **लेक लाडकी योजना** - २०२३ (ऑक्टोबर मध्ये घोषणा) आणि 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' २०२४ जुलै पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी.

• **निर्भया फंड २०१३ :** महिलाच्या सुरक्षेसाठी केंद्रसरकारने हा विशेष निधी उभारला. सीसीटीव्ही बसवणे, 'वनस्टॉप सेंटर' (सखी) उभारणे आणि फॉरेन्सिक लॅबचे आधुनिकीकरण करणे यासाठी हा निधी वापरला जातो. तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि 'सेफ सिटी' प्रकल्प सध्या राबवले जात आहेत.

• **विशाखा मार्गदर्शक तत्वे व POSH कायदा (२०१३) :** कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा करण्यात आला असून, या अंतर्गत तक्रार समिती (ICC) स्थापने करणे बंधनकारक आहे.

• **मिशन शक्ती :** महिलांचे संरक्षण, सुरक्षा आणि समीकरण यासाठी ही एक एकात्मिक योजना आहे. यात 'सबल' (सुरक्षेसाठी) आणि 'सामर्थ्य' (सक्षमीकरणासाठी) असे दोन उपविभाग आहेत. शक्ती कायदा महाराष्ट्र - विशेष उल्लेख, यात महाराष्ट्राने महिला आणि बालकांवरील अत्याचारांच्या बाबतीत मृत्युदंडापर्यंतची शिक्षा सुचवणारा हा कायदा तयार केला. ज्यामुळे गुन्हेगारांमध्ये धाक निर्माण होईल.

९) **२०२४ च्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय समिती स्थापना:** राज्यस्तरीय उच्चधिकार समिती मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, राज्यस्तरीय विशेष कृतिदल म्हणून महिला व बालविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हास्तरीय समिती ही पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली आहे.

२०२४ चे धोरण महिलांना केवळ लाभार्थी न मानता त्यांना देशाच्या आणि राज्याच्या विकासात समान भागीदार बनवण्याच्या उद्देश्याने तयार करण्यात आले आहे. म्हणून हे सुशासन वाढवण्यासाठी/सुशासनवाढवण्यासाठी महत्वाचे पाऊल आहे. तसेच महिला सुरक्षासाठी देखील महत्वाचे धोरण आहे असे दिसून येते.

**महिला सुरक्षा धोरणाचे वास्तव :-**

भारतातील महिलांच्या संरक्षणासाठी अनेक महत्वाचे कायदे आणि महिला सुरक्षा विषयक धोरणे आखण्यात आली आहेत. त्यात विविध महिलांविषयक धोरणांबरोबरच पॉक्सो कायदा POCSO, विशाखा मार्गदर्शक तत्वे POSH Act, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५, निर्भया फंड आणि विविध योजना व उपक्रम येतात. मात्र सुशासन आणि महिला सुरक्षा हे कोणत्याही प्रगत समाजाचे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. केवळ कायदे बनवून महिला किंवा महिला धोरणे आणून महिला सुरक्षित होत नाहीत, तर त्या कायद्याची व धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि पारदर्शक प्रशासन याची सांगड घालणे आवश्यक असते.

पण वास्तविक स्थिती पाहता NCRB च्या अहवाला नुसार महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वार्षीक वाढ दिसून येते आहे. यात एकुन वर्षभरात महिलांवरील गुन्ह्यांच्या अंदाजे ४.५ लाख ते ४.८ लाख प्रकरणांची नोंद झाली आहे. दर १ लाख महिलांमागे गुन्ह्यांचा दर अंदाजे ६६.४ इतका आहे. गुन्ह्यांचे स्वरूप पाहता पती किंवा नातेवाईकांकडून क्रुरता अंदाजे ३१.४% असे आहे, विनयभंग अंदाजे १८.७%, बलात्कार अंदाजे ७.१% आहे. तसेच सायबर गुन्हे म्हणजेच तंत्रज्ञानाच्या युगात महिलांवरील सायबर गुन्ह्यां मध्ये २०% ते २५% नी वाढ झाली आहे. या मध्ये प्रामुख्याने सोशल मिडिया वरील छळ, मॉर्फिंग, ओळखीची चोरी इ. गुन्ह्यांत वाढ झाली आहे असे दिसते. NCRB Report २०२४ च्या आकडेवारीनुसार पती आणि नातेवाईकांकडून होणारा छळ हे महिलांवरील अत्याचारांचे मुख्य कारण आहे. हे सुशासनासमोरील मोठे आव्हान आहे. कारण हे गुन्हे घराच्या चार भिंतींच्या आत घडतात, जिथे पोलिसांची पोहोच मर्यादित असते. तसेच कमी असलेला दोषी सिद्धीदर (Conviction Rate) हा गुन्हेगारांना अभय देणारा ठरत आहे.

आणि म्हणून सुशासनाची सर्वात मोठी अडचण ही न्याय मिळवण्याच्या गती मध्ये आहे. कारण भारतात महिलांवरील गुन्ह्यांचा दोषीसिद्धी दर (Conviction Rate) केवळ २५% ते ३०% च्या दरम्यान आहे. याचा अर्थ १००% पैकी ७०% पेक्षा जास्त आरोपी पुराव्याअभावी किंवा प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेमुळे सुटतात.

तसेच सुशासनासाठी व महिला सुरक्षा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख आव्हाने हे पितृसत्ताक मानसिकता आहे. कारण अनेकदा प्रशासनातील लोक आणि समाज दोषारोप महिलांवर करतात. तसेच न्यायालयीन विलंब आहे. यात भारतात गुन्हे सिद्ध होण्यासाठी प्रमाण अत्यंत कमी आहे. खटले वर्षानुवर्षे चालल्यामुळे गुन्हेगारांमध्ये भीती उरलेली नाही, पोलीस दलातील अनास्था: अनेकदा 'एफ आय आर' नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली जाते. पोलीस दलात महिलांचे प्रमाण अद्यापही कमी आहे आणि ग्रामीण व शहरी दरीमुळे शहरी भागात तंत्रज्ञान आहे पण, ग्रामीण भागात महिलांना कायद्याची माहिती आणि मदत मिळवणे आजही कठीण आहे. इत्यादी सुशासनासाठी व महिला सुरक्षा धोरणाच्या अंमलबजावणीत आव्हाने येतात ही सुशासन आणि महिला सुरक्षा धोरणाची वास्तविक स्थिती आहे.

**निष्कर्ष :-**

सुशासनासाठी व महिला सुरक्षितेसाठी शासनाने केलेली धोरणे ही खरच खूप महत्वाची आहेत. मात्र त्यांची अंमलबजावणी फक्त कागदोपत्री न होता सर्व अडथळ्यांचा सामना करून प्रत्यक्षात होणे गरजेचे आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या ताज्या अहवालानुसार (२०२३-२४) मध्ये प्रसिद्ध झालेली आकडेवारी, भारतातील महिलांवरील अत्याचारांची स्थिती चिंताजनक असली, तरी सुशासनाच्या माध्यमातून तक्रारी नोंदवण्याचे प्रमाण ही वाढले आहे. सुशासनाच्या दृष्टिकोनातून हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, जिथे पोलिस यंत्रणा अधिक सक्रिय असते, तिथे गुन्ह्यांची नोंद जास्त होते.

महिलाविषयक धोरणात वेळोवेळी सुधारणा करून धोरणे अमलात आणलेली दिसतात. त्यात २०२४ चे धोरण अधिक महत्वाचे दिसून येते. कारण या धोरणात अनेक योजनांची तात्काळ अंमलबजावणी झालेली दिसून येते व जुन्या योजनांमध्ये नविन सुधारणा करून त्या लागू केलेल्या आहेत. मात्र या धोरणाला देखिल मागील धोरणा प्रमाणे किती यश मिळते, हा एक प्रश्न NCRB च्या गुन्ह्यांच्या नोंदीवरून पडतो. महिला सुरक्षा हा सुशासनाचा आत्मा आहे.

जोपर्यंत महिला निर्भयपणे रात्री-अपरात्री बाहेर फिरू शकत नाहीत, तोपर्यंत सुशासन ही संकल्पना अपूर्ण आहे. कायदे, तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव यांचा विवेकी संगमच महिलांना सुरक्षित भारत देऊ शकेल.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे - २००३ (खंड १७ भाग ३) महाराष्ट्र शासन, संपादकीय मंडळ पृ. क्र. २८२

२) साबळे के. के - २०२१, 'महिलांचे कायदे आणि संरक्षण', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. १७

३) अहिरे सुनंदा. ल., साळुंके उषा. य. - २०१२, 'स्त्री अभ्यासाच्या दिशा', अथर्व अथर्व पब्लिकेशन्स धुळे पृ.क्र. ५

४) महिला धोरण - २०२४ महाराष्ट्र शासन

५) वैरागडे उज्वला, मुळे विद्युल्लता २०१२ 'समुदायक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण', विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, पृ. क्र. ३३४

६) पाटील अरुंधती सुर्यकांत - २०१२, 'स्त्री : आत्मभान ते सक्षमीकरण - एक प्रवास', अरुणा प्रकाशन लातूर, पृ. क्र. ६८

७) महाराष्ट्र शासनाचे महिला संबंधी धोरण - १९९४

८) वैद्य अ. वि. - २०११, 'भारतीय महिला व कायदा', महाराष्ट्र लॉ एजन्सी, पृ. क्र. २०१

९) कुटे माधवी - २००९, 'स्त्री सुक्ता', डायमंड पब्लिकेशन पुणे, पृ. क्र. ११२.

१०) NCRB Report २०२३-२४.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*